क्र.साप्रवि/रवका/प्र.प./न.क्र. ५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र.७२ दिनांक ०७/०९/२००६

विषय: अंध व अपंग अधिकारी/कर्मचारी यांना राज्य शासनाच्या निर्णयानुसार सुधारीत दराने विशेष वाहतूक भत्ता मंजूर करण्याबाबत.

संदर्भ : १) सा.आ.क्र. १०० दि. २४.९.१९८०
२) सा.आ.क्र. १०० दि. २४.९.१९८० ची सु.चि.क्र.१ दि. २०.६.१९८४
३) सा.आ.क्र. १०० दि. २४.९.१९८० ची सु.चि.क्र.२ दि.२०.७. १९९१

--------

सामान्य आदेश क्र. १०० दिनांक २४.९.१९८० अन्वये पूर्वीच्या म.रा.वि.मंडळातील अंध व अपंग अधिका-यांना/कर्मचा-यांना शासनाच्या धर्तीवर विशेष वाहतूक भत्ता मंजूर करण्यात आला आहे. सदर भत्त्यात शासनाने वेळोवेळी केलेल्या वाढीनुसार बदल करण्यात आला असून त्या बाबतच्या सूचना संदर्भिय क्र.२ व ३ च्या सुधारपत्रान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. आता शासनाने शासन निर्णय क्र. वाहभ-१००३/प्र.क्र.६४/सेवा-५ दिनांक २.८.२००४ अन्वये विशेष वाहतूक भत्त्यात वाढ केली आहे.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वितरण कंपनीतील अंध व अपंग अधिका-यांना/कर्मचा-यांना सामान्य आदेश क्र.१०० दि.२४.९.१९८० अंतर्गत देण्यात येणारा विशेष वाहतूक भत्ता वाढीव दराने अदा करण्यास व्यवस्थापकीय संचालक (म.रा.वि.वि.कं.म.) यांनी संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन मंजुरी दिली आहे.

४. त्यानुसार अंध व अपंग अधिका-यांना/कर्मचा-यांना द्यावयाच्या विशेष वाहतूक भत्त्याचे सुधारीत दर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे असतील.

| अ.क्र | कर्मचा-याची वेतनश्रेणी | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रुपये) | |
|---|---|---|---|
| | | "अ-१" आणि "अ" वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
| १. | रु. ९१७० ते २०३३० किंवा त्याहून वरच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे अधिकारी | १,६०० | ८०० |
| २. | रु.६०८५-१५५४० किंवा त्याहून वरच्या परंतू रु.९१७०-२०३३० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे अधिकारी/कर्मचारी | ८०० | ५०० |
| ३. | रु.६०८५-१५५४० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी | ५०० | ५०० |

५. विशेष वाहतूक भत्त्यामधील उपरोक्त वाढ खालील अटींच्या अधीन राहील :-

क) उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केलेली "अ-१" आणि "अ" वर्ग शहरे स्थानिक पूरक भत्त्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या शहराच्या वर्गीकरणाप्रमाणे राहतील.

ख) कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांचा एकत्र परिसर असेल अशा ठिकाणी राहणा-या कर्मचा-यांना वरील तक्त्यात नमूद केलेल्या दराच्या निम्म्या दराने, मात्र अशा प्रकारे दर निम्मा केल्याने तो रुपये ५०० /- पेक्षा कमी होत असल्यास, किमान रुपये ५००/- या दराने वाहतूक भत्ता मंजूर करण्यात येईल.

ग) ज्या कर्मचा-यांना म.रा.विद्युत वितरण कंपनीकडून वाहतूक सुविधा (Company Transport) पुरविण्यात आली आहे त्यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

घ) रजा, प्रशिक्षण, दौरा इत्यादी कारणांमुळे ३० दिवसांपेक्षा जास्त अनुपस्थितीच्या कालावधीसाठी हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

६. सा.आ.क्र.१०० दि.२४.०९.१९८० मधील इतर अटी व शर्ती अबाधीत राहतील.

७. महावितरण कंपनीच्या अंध व अपंग अधिका-यांना व कर्मचा-यांना सुधारीत दराने वाढीव विशेष वाहतुक भत्ता दिनांक ०२.०८.२००४ पासून अनुज्ञेय राहील.

( सु.य. पाटील )
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :

महावितरण कंपनीच्या विभागीय व त्यावरील स्तराच्या कार्यालयांना प्रेषण यादीनुसार.